# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 July 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०७ जूलै २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- देशात आगामी जनगणना प्रक्रियेला पुढच्या वर्षी एप्रिल महिन्यापासून सुरुवात
- सार्वजनिक वितरण व्यवस्थेतल्या कथित तांदूळ भ्रष्टाचार प्रकरणी चौकशीचे विधानसभा अध्यक्षांचे आदेश
- छत्रपती संभाजीनगर इथला 'श्याम देशपांडे ग्रंथसखा पुरस्कार' अंबाजोगाईचे अभिजित जोंधळे यांना जाहीर

आणि

- गंगाखेड तालुक्याल्या ४१ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची नोंदणी रद्द

****

देशात आगामी जनगणनेची प्रक्रिया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार असल्याचं नोंदणी महासंचालक आणि जनगणना आयुक्त कार्यालयानं सांगितलं आहे. प्रारंभीच्या टप्प्यात घरांची नोंदणी आणि मोजणी होईल, त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना होईल, त्यात जातनिहाय जनगणनेचा समावेश असेल असं या कार्यालयानं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. यासाठी एक जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान प्रशासकीय सीमारेषांमध्ये कुठलेही बदल करू नये असं आवाहन जनगणना आयुक्तांनी सर्व राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांना केलं आहे.

****

राज्यात सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेतल्या तांदळाच्या खरेदी आणि वितरणात भ्रष्टाचार होत असल्याच्या आरोपाची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी तो अहवाल सादर करावा असे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले

आहेत. काँग्रेसचे नाना पटोले यांनी हा आरोप केला होता. त्यावरच्या प्रश्नादरम्यान अध्यक्षांनी आज हे आदेश दिले.

नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा इथे सुरू असलेल्या तेल भेसळीप्रकरणी संबंधित कारखाना तातडीने बंद करून संबंधित अन्न आणि औषध प्रशासन सह आयुक्त तसेच सहाय्यक आयुक्त यांना निलंबित करण्याची घोषणा, मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली. याबाबतचा मूळ प्रश्न आमश्या पाडवी यांनी उपस्थित केला होता. संबंधित कंपनी वारंवार तेल भेसळप्रकरणी दोषी आढळून आली आहे, सोयाबीन, शेंगदाणा तेल यांचे नव्याने घेण्यात आलेले नमुने देखील भेसळयुक्त आढळून आले आहेत, असं आढळल्यावर ही कंपनी अधिकाऱ्यांनी तातडीने बंद करण्याची कारवाई करणे आवश्यक होते मात्र कारवाई न केल्यानं, त्यांना निलंबित करण्याची घोषणा झिरवाळ यांनी केली.

****

नवीन भरती प्रक्रियेमध्ये अनुसूचित जमातीची बिंदूनामावलीतील सर्व पदं भरणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. ते आज विधानसभेत बोलत होते. यासोबतच नवे आकृतीबंध आणि भर्तीचे नियम दीडशे दिवसात पूर्ण करून तात्काळ विशेष भर्ती मोहीम सुरू करणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. जात प्रमाणपत्र वैधते'ची पद्धत अधिक पारदर्शक आणि जलद करणार असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. रिक्त झालेली अनुसूचित जमातींची पदभरती सुरू असून आदिवासी समाजावर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली, ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या विट्स हॉटेल निविदा प्रकरणात विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी लक्षवेधी सूचना मांडली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आल्यामुळे या प्रकरणी दाखल लक्षवेधी सूचनेला अर्थ नसल्याचं सांगितलं. मात्र त्यावरही विरोधकांचं समाधान न झाल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण प्रक्रियेच्या उच्चस्तरीय चौकशी करण्याची सदनाला ग्वाही दिली.

****

शेतकरी कर्जमाफी तसंच शेतमालाला हमीभाव या मागणीकडे लातूरचे आमदार अमित देशमुख यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. लातूरसह मराठवाड्यातल्या डाळ मिलसंदर्भातही बोलतांना देशमुख यांनी शेतीपूरक उद्योग तसंच शेतमालावरील प्रक्रिया उद्योगासंदर्भात राज्य सरकारने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. दिल्लीकडे जाणाऱ्या महामार्गावर लातूर इथं ट्रक टर्मिनल उभारण्याची मागणी देशमुख यांनी केली. या मागण्यांचा अर्थसंकल्पाच्या पुरवणी मागण्यांमध्ये समावेश करावा, असं आवाहन देशमुख यांनी केलं. वीजेचे वाढीव दर, स्मार्ट मीटर, कामगारांचे प्रश्न तसंच शक्तिपीठ महामार्गाचा मुद्दाही देशमुख यांनी सदनासमोर मांडला. ते म्हणाले –

**बाईट – अमित देशमुख**

****

राज्यात कृत्रीम फुलांच्या वापरावर बंदी आणणार का, असा प्रश्न बदनापूरचे आमदार नारायण कुचे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला. ते आज विधानसभेत बोलत होते. नैसर्गिक फुलांच्या वापराबाबत धोरणात्मक निर्णय लवकरात लवकर घ्यावा अशी मागणी आमदार कुचे यांनी केली. सदर अधिवेशन संपण्यापूर्वी एक बैठक घेऊन यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

****

राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण ५१ हजार ५५८ मंजूर योजनेपैकी २५ हजार ५४९ योजनांची कामे पूर्ण झाली असल्याचं पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विधान परिषदेत सांगितले. याबाबत सदस्य डॉ. प्रज्ञा सातव यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या मौजे लासूर शाळा बांधकाम आणि मौजे गुरुधानोरा इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकाम प्रकरणी संबंधित शाखा अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांना निलंबित करण्यात आलं आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात ही माहिती दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या ‘संडे क्लब’ आणि देशपांडे परिवाराच्या वतीनं दिला जाणारा ‘श्याम देशपांडे ग्रंथसखा पुरस्कार’ बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाईचे

अभिजित जोंधळे यांना जाहीर झाला आहे. अकरा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप असून तीन ऑगस्टला हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. वाचन संस्कृती रुजवण्यासाठी मोलाचे कार्य करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. अंबाजोगाईत अनुराग पुस्तकालय चालवणारे जोंधळे यांनी गेल्या दहा वर्षांपासून 'पुस्तकपेटी' हा अभिनव उपक्रम राबवला आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील किमान १५ हजार विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे.

****

परभणी जिल्ह्यात गंगाखेड तालुक्यातल्या ४१ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. नियमबाह्य पध्दतीने स्थापन करण्यात आलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्यात यावी, अशी 'लक्षवेधी' मागणी गंगाखेडचे आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती. त्यानुसार या संस्थांना नोटीस देऊनही साठ दिवसांत समाधानकारक उत्तर न आल्याने ही कारवाई करण्यात आली.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ जुलै रोजी होणार आहे. वाल्मिक कराडसह इतर आरोपींच्या मालमत्ता जप्ती बाबतच्या अर्जावर आज युक्तिवाद झाला त्यानंतर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी ही माहिती दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं मध्यवर्ती बसस्थानकात नव्या कोऱ्या पाच बीएस-६ या बसेस दाखल झाल्या आहेत. यापूर्वी मार्च महिन्यातही पाच बसेस मिळाल्या होत्या. मुक्ताईनगर इथले वारकरी दाम्पत्य नारायण वानखेडे आणि लिलाबाई वानखेडे यांच्या हस्ते नवीन बसचं पूजन करून त्या पंढरपूरला रवाना केल्या. या नवीन बसमुळे प्रवाशांना चांगली सेवा देण्यास मदत होईल, असा विश्वास आगार व्यवस्थापक अजय पाटील यांनी व्यक्त केला आहे.

****

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्या त्या ठिकाणच्या परिस्थिती बघून लढवल्या जातील, असं भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी म्हटलं आहे. ते आज परभणी इथं वार्ताहरांशी बोलत होते.

****

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परवा नऊ तारखेला राज्यव्यापी एक दिवसीय संप पुकारला आहे. छत्रपती संभाजीनगर इथंल्या मुख्य कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

****

राज्यातले अशंतः अनुदानित शिक्षक उद्यापासून दोन दिवस राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करणार आहेत. अंशतः अनुदानित शाळांना लागणाऱ्या निधीची तरतूद पुरवणी मागण्यामध्ये न केल्यामुळे हा बंद पाळण्याचा निर्णय संघटनेनं घेतला आहे. बीड जिल्ह्यातून अनेक शिक्षक मुंबईकडे रवाना झाले.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज जळगाव रस्त्यावरची अतिक्रमणं निष्कासित करण्यात आली. दरम्यान, अतिक्रमणं काढलेल्या जालना रस्त्याच्या रुंदीकरणाची तयारी झाली आहे. या भागात सर्व्हिस रोडसाठी मोजणीचे काम हाती घेतले असल्याची माहिती एमआयडीसीचे विभागीय अधिकारी अमित भामरे यांनी दिली.

****

जालना शहरातील नागरी समस्यांच्या मुद्यावर आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं महानगरपालिकेसमोर आंदोलन करण्यात आलं. आपल्या मागण्यांचे निवेदन आयुक्तांना सादर करण्यात आलं.

****

नाशिक जिल्ह्यात पावसाची संततधार सुरूच असल्यानं गंगापूर धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. सध्या धरणातून गोदावरी नदी पात्रात ६ हजार ३३६ घनफूट प्रति सेकंद इतका विसर्ग सुरू आहे.

****